प्रकरण दुसरे

# मंजुश्री गोखले यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्व

### प्रकरण दुसरे

## मंजुश्री गोखले यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात लेखिका मंजुश्री गोखले यांचा सर्वांगीण वाङ्मयीन परिचय घडवायचा आहे. त्यांचे लेखन साहित्य हे नित्य जीवनातील अनुभवाने साकारलेले साहित्य आहे. लहानपणीच लेखन, वाचन, खेळ व अभ्यास यात आवड असल्याने व कुटुंबात मिळालेले प्रेम तसेच त्यांच्यावरील आई-वडिलांचे विशिष्ट संस्कार या घटकाने त्यांचे बालपण परिपूर्ण आहे.

त्यांच्या लेखन साहित्यात 'स्त्री' ला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणून त्यांनी 'तुकयाची आवली' आणि 'ओंकाराची मेख' या चरित्रांचे लेखन केले आहे.

मंजुश्री गोखले यांचा जन्म इचलकरंजी येथे २१/११/१९५७ रोजी मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. घरी चार भाऊ व स्वत: लेखिका मुलगी म्हणून एकट्याच असल्याने घरी त्यांचे खूप लाड होत होते. त्यांचे बालपण आनंदी वातावरणात गेले. लहानपणापासून त्या शाळेत हुशार असल्याने इयत्ता चौथीच्या बोर्ड परीक्षेत सर्वप्रथम आल्या. त्यांचे प्राथमिक शिक्षण सरस्वती विद्या मंदिर या श्रीमती कलाबाई मैंदरगी यांच्या शाळेत अंत्यत संस्कारशील वातावरणात पूर्ण झाले.

गोखले यांचे माध्यमिक शिक्षण व्यंकटराव हायस्कूल इचलकरंजी व गोविंदराव हायस्कूल फॉर गर्लस् हे सध्या गंगा मैया हायस्कूल या ठिकाणी झाले. या शालेय वयात वक्तृत्व स्पर्धा, कथा-कथन स्पर्धा, बुद्धीमापन परीक्षा, संस्कृत पाठांतर स्पर्धामध्ये यश संपादन केले. तसेच मैदानी खेळ, कब्बडी, खो-खो, लांब उडी व उंच उडी, धावणे यामध्ये शालेय व आंतर शालेय स्पर्धेत प्राविण्य मिळवले. याचवेळी हिंदी भाषा परीक्षा तृतीय पर्यंत विशेष श्रेणी विभागात यश संपादन केले.

मंजुश्री गोखले या कनिष्ठ विद्यालयीन व महाविद्यालयीनशिक्षण घेत असताना त्या प्राथमिक व माध्यमिक स्तरावर जशा अनेक स्पर्धामध्ये यशस्वी ठरल्या तसेच या ही शिक्षण क्षेत्रात चमकल्या आहेत. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी सध्याचे दत्ताजीराव कदम कॉलेज या नावाने ओळखले जाते. य ठिकाणी पूर्ण

झाले. या दरम्यान ही आंतर कॉलेज्स, आंतर जिल्हा, आंतर विभागीय आणि राज्य पातळीवरील वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा तसेच मैदानी खेळात कबड्डी, खो-खो यामध्ये विशेष प्राविण्य मिळवले व आपले पदवी शिक्षण पूर्ण केले.

पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांचा विवाह आई-वडिलांनी नंदकुमार रामचंद्र गोखले या टेक्सटाईल इंजिनिअर असणाऱ्या युवकाशी केला आणि त्या पूर्वाश्रमीच्या सुरेखा रामचंद्र गोवंडे या सध्याच्या मंजुश्री नंदकुमार गोखले नावाने ओळखल्या जावू लागल्या. त्यांचे वैवाहिक जीवन सुखी व समाधानी आहे. कॉलेजच्या वयातच त्यांना सतत वाचन करणे, लेखन करणे या विषयीचा छंद असल्याने त्या नेहमी लेखनात मग्न असत. कविता लिहिणे, कथा लिहिणे, सामाजिक विषयावर लेख लिहिणे हे चालूच होते.

विवाहानंतर त्यांचे वास्तव्य मुंबई येथील डोंबविली येथे गेले. यानंतर त्यांचे पती नंदकुमार गोखले यांनी इचलकरंजी येथे डेक्कन को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल मध्ये नोकरी स्वीकारली आणि पुन्हा एकदा त्या पती समवेत बालपणीच्या परिसरात नव्याने रममान झाल्या. दरम्यानच्या काळात त्यांना दोन मुले झाली ती म्हणजे मोठी प्राजक्ता व छोटा विक्रांत होय.

मंजुश्री यांच्यावर त्यांच्या आईने उत्तमरित्या संस्कार केले असल्याने त्या ही आपल्या दोन्ही मुलांचे संगोपन व त्यांच्यावर संस्कार करण्यात मागे राहिल्या नाहीत. मुलांच्या लहानपणीच्या जडण-घडणीसाठी त्यांनी आठ ते दहा वर्षे घालविली आहेत. मुले मोठी होऊन शाळेत जाऊ लागल्यानंतर त्या 'दि मॉडर्न इंग्लिश स्कूल, इचलकरंजी' या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सहाय्यक शिक्षिका म्हणून नोकरीस लागल्या. येथे त्या सहा वर्षे शिक्षिकेचे काम करीत होत्या. याच काळात त्यांच्या प्रतिभेला अंकुर फुटले त्यांच्या मनातील लेखिका होण्याच्या सूप्त इच्छा सत्यात उतरत होती. या शाळेचे प्रिन्सिपल श्री. जे. एम. साळुंखे यांनी मंजुश्री यांची प्रतिभा ओळखली आणि शाळेचा सांस्कृतिक विभाग सोपविला आणि त्यांनी संधीचे सोने केले. जिल्हा स्तरावरील वक्तृत्व स्पर्धा, एकांकी स्पर्धा यामध्ये मॉडर्न हायस्कूलचा नेहमीच सहभाग असायचा. मंजुश्री यांचे नविन विषय व नविन लेखन असल्याने या सहा वर्षांच्या काळात अनेक स्पर्धामध्ये मॉडर्न हायस्कूलचे वर्चस्व होते.या शाळेत त्या विद्यार्थ्यांच्या लाडक्या शिक्षिका होत्या.

त्यांनी मॉर्डन हायस्कूल मधील नोकरी सोडली कारण त्यांना बी. एड. चे शिक्षण पूर्ण करावयाचे होते त्यांनी डी. के. टी. इ. या संस्थेच्या बी. एड. कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन बी. एड्. चे शिक्षण प्रथम श्रेणी वर्ग सह. कॉलेजमध्ये डिस्टिंक्शनसह पहिल्या आल्या. त्यानंतर वर्षभरातच त्यांच्या पतीनी कोल्हापूर येथे नवी नोकरी पत्करली आणि त्या आपल्या परिवारासह कोल्हापूर येथे राहण्यास आल्या. कोल्हापूर सारख्या सुसंस्कृत शहरात त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक विस्तारत गेले त्यांच्या प्रतिभेला येथे पून्हा बहर येऊ लागला. त्या शिवाजी विद्यापीठातून बहिस्थ विद्यार्थीनी म्हणून प्रवेश घेऊन मराठी विषयामध्ये डिस्टिंक्शन मधून विद्यापीठात अकराव्या आल्या.

एम. ए. पूर्ण झाल्यानंतर त्यांनी मॉडर्न हायस्कूलसाठी अ. ब. क. ड. ई ही शालेय एकांकी लिहिली आणि ती चैतन्य प्रकाशनाने पुस्तक रुपाने प्रसिद्ध केली. त्यांना या काळात थोडी उसंत मिळाल्याने लेखनाची गती वाढली होती. त्यांनी चार कविता संग्रह लिहिले. त्यांच्या 'शिशिर सांज' या कविता संग्रहाला वसंत बापट यांची प्रस्तावना लाभली आहे.तसेच 'तुकयाची आवली' या चरित्र कादंबरीस अमरावतीचा राष्ट्रपती पूरस्कार, बुलढाण्याचा तुका म्हणे पुरस्कार मिळाला आहे. तसेच भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी ही कादंबरी वाचून आपल्याला आवडल्याचे पत्र लिहून कळविले आहे.

**मंजुश्री गोखले यांचे प्रकाशित साहित्य**

१. अबकडई : जीवनसत्त्वाचे महत्त्व पटवून देणारी शालेय एकांकिका- जिल्हा प्रथम पुरस्कार

२. शालेय उपक्रम : नवेमार्ग नव्या दिशा -कार्यानुभव या विषयावरील अभ्यासपूर्ण व अनुभवसिद्ध शोध निबंध

३. ओम मित्राय नम : वनीकरण या विषयावरील पर्यावरणाचे महत्त्व पटवून सांगणारी जिल्हाप्रथम पूरस्कार प्राप्त मनोरंजक शालेय एकांकिका.

३. आणि सदाफुली रंगीत झाली : सदाफुलीचे महत्त्व सांगणारी शालेय एकांकिका

४. सत्यम् शिवम् सुंदरम् - भारतातील सणाविषयीची उद्बोधक माहिती रंजकपणे सांगणारी शालेय एकांकिका व त्याचाच दूसरा भाग ओंजळीतील मोती हा कथासंग्रह

५. सत्यमेव जयते : विनोदी कथासंग्रह

६. बुफे आणि फेफे : विनोदी खिस्से असलेला संग्रह

७. फास्ट-ब्रेकफास्ट : हे रेसिपीवरील पुस्तक

८. कैलासगडची स्वारी : या मंदिराचे महात्म्य सांगणारा ग्रंथ

९. जुन्या इसापच्या नव्या गोष्टी : ही लहान मुलांच्यासाठी गंमतीदार पुस्तक

**लेख 'पुढारी' बहार पुरवणीमध्ये सातत्याने शीर्षक लेख प्रसिद्ध**

१. हिंदी चित्रपटातील पोलिसी अब्रुचे धिंडवडे.

२. भावनांचा जळता उद्रेक थोपावयला हवा- श्री बाळ ठाकरे यांना सबुरीचा सल्ला.

३. घर देता का घर? वृद्धाश्रम संबंधी नवा दृष्टिकोण सांगणारा लेख श्रीयुत मनोहर जोशी यांनी नावाजलेला लेख

४. मन असलेला बाल माणूस : पौंगडावस्थेतील मुलांच्या मनोव्यापारासंबंधीचा मानसशास्त्रीय लेख

५. हिंदुस्थान की घोटाळेस्थान ? राजकारणातील आर्थिक व त्या संबंधातील सामान्य माणसांची प्रतिक्रिया यांची सांगड घालणारा लेख

६. शेतकऱ्यांच्या आत्महत्या

७. बलात्कार

८. सोनिया गांधी

९. संदेश परिवहन मंडळ, ट्रकच्या मागील संदेशावरून लिहिलेला विनोदपूर्ण लेख इत्यादी विषयावरील ज्वलंत लेखन

१०. चिन्ना - कथासंग्रह

११. 'तुकयाची आवली' - कादंबरी

१२. वेगळी वाट - कथासंग्रह

१३. अक्षरलेणे - एकांकिका

१४. भुलवा -एकांकिका

१५. गझलगंध - गझलसंग्रह

**कविता : विविध विषयावरील सुमारे पाचशे लिखित कविता संग्रह**

१. शिशिरसांज - भावना वैविध्याने नटलेल्या छपन्न कवितांचा संग्रह



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

२. फुलपाखरांचा गाव - शंभर चारोळींचा संग्रह

३. रानगंध - निसर्गकविता

४. आकृतीगंध- चारोळींचा संग्रह

५. ठिकठिकाणी कवि संमेलनातून सहभाग व कवि संमेलनाचे आयोजन

६. बालगीतांच्या दोन कॅसेट प्रकाशित

**४) चित्रपट**

१. गीतलेखन - प्रेमबंधन

२. सांग प्रिये तू कुणाची - गीतकार

३. सासूची माया - कथा, पटकथा-संवाद

४. मिंगो चित्रपट गीते

**५) निवेदिका**

१. श्री अरुण दाते यांच्या 'शुक्रतारा' या भावगीतांच्या कार्यक्रमाच्या निवेदिका

२. 'शब्द सुरांच्या झूल्यावर' या गीतांच्या कार्यक्रमात.

- काही कार्यक्रमात निवेदन म्हणून काम.
- शांताराम नांदगावकर यांच्यासह निवेदन व मुलाखतकार म्हणून काम.
- सलग तीन वर्षे 'बंदीजनांचे साहित्य' संम्मेलनात निवेदिका

**६) व्याख्याने**

- पुणे विद्यापीठात संत साहित्यावर व्याख्यान
- आकाशवाणीवर विविध विषयावर भाषणे
- ठिकठिकाणी भगवद्‌गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध, रामायण, महाभारत इत्यादी विषयावर प्रवचने
- इचलकरंजी, सांगली, तासगांव, कोल्हापूर, निपाणी, इस्लामपूर, परिते, कासेगाव येथे विविध विषयावर व्याख्याने कामगार कल्याण केंद्र कोल्हापूर, इचलकरंजी येथे व्याख्याने ठिकठिकाणी शाळा कॉलेजमधून विविध विषयावर व्याख्याने.

**दिग्दर्शिका :**

१. विविध स्पर्धांमधून एकांकिका व नाटकांचे दिग्दर्शन व पुरस्कार प्राप्त
   अबकडई-रोटरी क्लब प्रथम पुरस्कार (जिल्हा स्तर) मुख्याध्यापक संघ प्रथम पुरस्कार.

२. ओम मित्राय नमः रोटरी क्लब प्रथम पुरस्कार (जिल्हा स्तर) मुख्याध्यापक संघ प्रथम पुरस्कार.

३. भुलवा - द्वितीय पुरस्कार (जिल्हा स्तर)

४. तमोसा मा जोतिर्गमय - रोटरी क्लब व मुख्याध्यापक संघ द्वितीय पुरस्कार (जिल्हा स्तर)

**८) परीक्षक**

- विविध स्पर्धातून विविध स्तरावर परीक्षक म्हणून काम

१. यशवंतराव चव्हाण स्मृती नाट्यस्पर्धा

२. डॉ. आंबेडकर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

३. स्फूर्ती युवक मंडळ, इचलकरंजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

४. यशवंतराव चव्हाण चषक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा

५. बॅ. नाथ पै 'वाद' व वक्तृत्व स्वर्धा

**९) खेळाडू**

- १९७५-७६ मध्ये 'खो-खो' या खेळासाठी इंटरझोन सामन्यासाठी विद्यापीठ स्तरावर निवड
- १९८८-८९ च्या डिसेंबर मध्ये कलकत्ता येथे झालेल्या राष्ट्रीय खो-खो या सामन्यांसाठी कोल्हापूर स्टेट मुलींच्या संघाची व्यवस्थापिका म्हणून निवड आणि यशस्वी कामगिरी.

**१०) सहभाग- सामाजिक बांधिलकी**

१. अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद - कार्यकारिणी व आजीव सभासद

२. बालकुमार साहित्य सभा-शाखा कोल्हापूर- कार्यकारिणी सदस्य व आजीव सभासद

३. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, शाखा, कोल्हापूर आजीव सभासद

४. संस्कार भारती शाखा कोल्हापूर-कार्यकारिणी सदस्य.

**१२) इतर प्रशासकीय व्यक्तिमत्त्व, विद्यार्थी प्रिय स्वभाव, विद्यार्थ्यांचे प्रश्न यशस्वीपणे हाताळण्याची हातोटी, समाज सेवेची आवड, सहकार्याची आवड.**

**१३) आगामी प्रकाशने**

त्यांचे नव्याने येणारे व प्रकाशनाच्या वाटेवर असणारे साहित्य म्हणजे 'जोहार मायबाप जोहार' ही संत चोखा मेळा यांच्या जीवनावरील प्रदीर्घ कादंबरी लिहिली आहे. तसेच संत जनाबाई यांच्या जीवनावरील 'ओंकाराची रेख-जना' ही चरित्र कादंबरी लिहिली आहे.

तसेच २००९ मध्ये आपल्या मुलीकडे अमेरिकेला गेल्या या परदेश दौऱ्यातील अनुभवावर आधारित 'रंग-पश्चिमा' या नावाचे प्रवासवर्णन लिहिले आहे. केवळ वाचकांच्या आग्रहावास्तव दैनिक वृत्तपत्रातील ज्वलंत सामाजिक लेखांचे संकलन करून 'ऐसी अक्षरे' हे पुस्तक लिहिले आहे.

अनेक विविध विषयावर लेखन करणाऱ्या मंजुश्री गोखले यांनी दूरदर्शन 'इ' मराठी वाहिनीवरून प्रसारित झालेली 'सिद्धी विनायकाचा महिमा' या मालिकेचे लेखन केले आहे. त्यांचे सातत्यपूर्ण लेखन सुरू आहे.

**समारोप**

वरील सर्व विवेचनावरून मंजुश्री गोखले यांचा वाङ्मयीन व सर्वांगीण जीवन परिचय घडविला आहे.बालपणापासून वाचन, लेखन, अभ्यास, खेळाविषयक व्यासंग यातून त्या घडत गेल्या आहेत. त्यांचे बालपण, वैवाहिक जीवन सुखी समाधानी आहे. त्या संस्कारातून घडत गेल्या आहेत. त्या संवेदनशील मनाच्या, कुटुंबवत्सल, विद्यार्थी प्रिय, समाजाभिमुख आहेत. त्यांना अध्यात्मविषयी आवड, निसर्गाविषयी आवड तसेच पर्यावरण विषयक जाणीव जागृती आहे. या सर्व घटकांच्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि लेखनावर झालेला विशिष्ट संस्कार या सर्वांची प्रचिती येते.

पुढील प्रकरणात त्यांच्या 'तुकयाची आवली' या चरित्र कादंबरीचा आशय पहावयाचा आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.